शनिवार दि.२९ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
-ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

दैनिक लोकनेता बीड

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१९४ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी दरमहा ५० हजार रुपये मिळणार-उपमुख्यमंत्री शिंदे यांचे आदेश

## सिंधुदुर्ग किल्ला आणि परिसराचा विकास करण्याची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

क्रूरकर्मा औरंगजेबाच्या कबरीसाठी लाखो रुपये खर्च होत असतांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी तुटपुंजे अर्थसाहाय्य हा अन्याय आहे, अशी भूमिका हिंदु जनजागृती समितीच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर मांडली. या मागणीवर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी महसूल विभागाच्या सचिवांना (श्री शिवराजेश्वर मंदिरासाठी) दरमहा ५० हजार रुपये निधी वाढवून देण्यासाठी तात्काळ प्रस्ताव सादर करण्याचे लिखित आदेश दिले. तसेच महसूल विभागाच्या सचिवांना दूरध्वनी करून मंदिरासाठी दरमहा २५० रुपयांऐवजी ५० हजार रुपये देण्याचे स्पष्ट आदेशही दिले. या वेळी शासनाची मदत मिळण्याआधी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी तातडीने वैयक्तिकरित्या महाराजांच्या मंदिरासाठी ५० हजार रुपयांचे साहाय्य करून एक चांगला पायंडाही पाडला. तसेच त्यांनी नियमितपणे मंदिरासाठी निधी घेऊन जाण्यासही सांगितले. हिंदु जनजागृती समितीच्या वतीने उपमुख्यमंत्र्यांनी दिलेल्या सकारात्मक प्रतिसादाबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.

या प्रसंगी समितीच्या वतीने सतीश सोनार, रवि नलावडे आणि नांदेड येथील शिवसेनेचे आमदार आनंद बोंडारकर उपस्थित होते. केंद्रात काँग्रेस सरकारच्या काळात वर्ष २०१२ पासून क्रूरकर्मा औरंगजेबाच्या कबरीसाठी निधी देणे सुरू करण्यात आले होते. नोव्हेंबर २०२३ पर्यंत भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (ASI) विभागाने औरंगजेबाच्या कबरीच्या देखभालीसाठी ६.५० लाख रुपयांहून अधिक निधी खर्च केला आहे. महाराष्ट्राच्या अस्मितेचा विचार करता औरंगजेब हा एक क्रूर आक्रमक होता. त्याने छत्रपती संभाजी महाराजांवर अमानुष अत्याचार करून निर्घृण हत्या केली. असा आक्रमक आदरास पात्र नाही आणि त्याच्या कबरीच्या देखभालीसाठी निधी खर्च करणे महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचवणारे आहे. त्यामुळे हा निधी सरकारने बंद करावा आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी भरीव निधी द्यावा, अशी मागणी समितीने केली.छत्रपती राजाराम महाराजांनी स्वत: मालवण येथील सिंधुदुर्ग किल्ल्यावर बांधलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे हे एकमेव आणि प्राचीन मंदिर आहे. त्यामुळे येथे लाखो शिवप्रेमी आणि पर्यटक येतात. किल्ल्यावर बोटीने यावे लागते. त्यामुळे येणार्या पर्यटकांची योग्य सोय करणे आवश्यक आहे. किल्ला मोठा असल्यामुळे झाडी-झुडपे मोठ्या प्रमाणावर वाढली आहेत. त्या हटवून किल्ल्याचे सुशोभीकरण करणे, परिसरात सुंदर बगीचा तयार करणे, पर्यटकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय, प्रसाधनगृह आणि गोड्या पाण्याच्या विहिरीचे सुशोभीकरण करणे यां सारखी अनेक विकास कामे तातडीने व्हावीत, अशी मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.



## दर १५ दिवसांनी विधानसभा मतदारसंघाचा आढावा घेणार-मंत्री उदय सामंत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे (वृत्तसंस्था)**

शिवसेना पक्ष संघटन वाढीसाठी मी विविध गटाच्या बैठका आगामी काळात पुणे जिल्ह्यात व शहरात घेऊन संघटन वाढीचा आढावा संपर्क मंत्री म्हणून घेणार आहे. पदाधिकारी अधिक धावतात की मी अधिक धावतो याबाबत पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासोबत स्पर्धा करणार आहे. कार्यकर्त्यांनी जागेवर धावून उपयोग नाही, तर संघटनात्मक धावले तर संघटना जोरदार वाढेल. स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्यापेक्षा पक्षाचेसाठी काम करा, संघटना वाढली तर आपण मोठे होऊ, असे मत मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी येथे बोलताना व्यक्त केले.

पुणे शहर व ग्रामीण शिवसेना संवाद बैठकीचे आयोजन पुण्यातील डीपी रस्ते येथील शुभारंभ लॉन्स या ठिकाणी करण्यात आले होते त्यावेळी ते बोलत होते.यावेळी विधान परिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, माजी मंत्री विजय शिवतारे, आमदार शरद सोनवणे, माजी आमदार रवींद्र धंगेकर, रमेश कोंडे, नाना भानगिरे उपस्थित होते.सामंत म्हणाले, माझ्या जवळचे आले पाहिजे, आजूबाजूला फिरले तर मला काम समजेल असे नाही. तर तुमच्या कामामुळे मला सर्व गोष्टी समजेल. दर १५ दिवसांनी मी विधानसभा मतदारसंघ आढावा घेणार आहे. संघटना वाढवताना समोरील अनेकांचे लक्ष्य आपल्याकडे येत असते. पक्षप्रमुख एकनाथ शिंदे महायुतीबाबत निर्णय घेतील. गटबाजी पक्षात नसावी आपला एकच गट आहे शिवसेना आणि एकनाथ शिंदे आहे. माझे जवळचे संबंध देवेंद्र फडणवीस व एकनाथ शिंदे यांचे सोबत सारखे आहे. पण मला मंत्रीपद कोणी दिले तर एकनाथ शिंदे यांनी दिले आहे.रायगड व रत्नागिरी पालकमंत्री पदाची जबाबदारी त्यांनी मला दिली या गोष्टी मी विसरणार नाही. एकनाथ शिंदे यांना ताकद देण्यासाठी सर्वांनी मतभेद बाजूला ठेऊन एकत्र काम केले पाहिजे. आपले कर्तृत्व व नेतृत्व यास एकनाथ शिंदे यांची जोड मिळाली तर अनेक नगरसेवक आगामी निवडणुकीत आपल्या पक्षाचे निवडून येतील. संघटना विस्तार होण्यासाठी संर्पक अभियान, सदस्य नोंदणी मोहीम चांगल्याप्रकारे राबवली गेली पाहिजे. अनेकजणांनी मदत दिली गेली आहे त्याचे रुपांतर मतदानात करुन घेतले पाहिजे.



# पालकांनो मुलींची काळजी घ्या! समाजात घडणाऱ्या घटनेनंतर काळाची गरज

## पालक आणि पाल्यांमध्ये मनमोकळा संवाद गरजेचा!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली | संतोष कदम**

माणुसकीला काळीमा फासणाऱ्या गोष्टी समाजामध्ये वारंवार घडत आहेत. पालक आणि पाल्यांमधील मनमोकळा संवाद असणे आवश्यक आहे व काळाची गरज बनली आहे. दोन दिवसापूर्वी वाघोलीत एक काळिमा फासणारी घटना घडली. इयत्ता ४ च्या वर्गात शिकणाऱ्या मुलीला खाउचे आमिष दाखवत तिला फसवून त्या नराधमाने लैंगिक अत्याचार केला. खरे पाहता एवढ्या लहान वयात एकट्या मुलीला शाळेत पाठवणे पालकांना किती प्रमाणात योग्य वाटले असावे. कुणी सोबत असते तर या नराधमाला असा डाव साधता आला नसता. यात एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की रस्त्याने जा ये करणाऱ्या नागरिकांची सजगता कमी पडत आहे जो तो फक्त आपल्या कामाच्या व्यापात गुंग आहे. आजूबाजूच्या गोष्टीशी त्यांना कुठलेही सोयर सुतक नाही असे जाणवते. नागरिकांनी रस्त्याने येता जाता आपल्या आजूबाजूला काय घडतंय यासाठी सजग राहण्याची गरज आहे, जेणेकरून अशा नराधमांना वेळीच ठेचून काढता येईल. नागरिकांनी सहकार्याची भावना दाखवली तर नक्कीच पोलिसांवर येणारा ताण नक्कीच कमी होणार आहे.

**सोशल मीडिया ठरतेय कारणीभूत**–महिला व मुलींवर अत्याचार होण्यात बऱ्याच प्रमाणात सोशल मीडिया जबाबदार आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून मुलगा व मुलगी जवळ



येतात. याची भनक पालकांना लागत नाही. अल्पवयीन मुलींना फारशी समज राहत नसल्याने त्या मुलांकडून टाकण्यात आलेल्या बनावट प्रेमाच्या पाशात अडकतात. त्यानंतर प्रेमाच्या आड शारीरिक शोषण केले जाते. अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची घटना आठ दिवसांतून एकदा घडते. काही पालक तर पोलिसात तक्रार देण्यासही जात नसल्याचे दिसून आले आहे. यातून या प्रकारांना आणखीच बळ मिळत असल्याचे दिसते.

**हल्ली पालकांकडून दुर्लक्ष होतय मुलांकडे**–वेळीच सावध व्हा पालक वर्ग मुल– मुली शाळेत ,कॉलेज मधे जात नसुन हल्ली आई–वडीलांची फसवणूक करत आहे .शाळा कॉलेजला जाण्याचे ते बहाणे करून बाहेर उनाड मित्र–मैत्रिणी सोबत फिरत असतात.पालकांना वाटत की आपली मुलं शाळा कॉलेजला गेली आहेत.

सध्याची परिस्थिती पाहता. तरुण–तरुणी वर्ग वाईट सवयींना बळी पडत आहे.कुठेही टपरीवर मुली सिगारेटचा धूर सोडताना दिसून येत आहे.त्यांना पालकांनी वेळीच आवरलं पाहिजे.

**मुलांना उपदेश करण्याची पद्धत बदला**– मुलांना एखादी गोष्ट वारंवार सांगितल्याने ते भडकत असतील तर तुमची सांगण्याची पद्धत बदला. त्यांना तीच गोष्ट नव्याने सांगण्याचा प्रयत्न करा.

**संतप्त प्रतिक्रिया देणे टाळा**–काही पालक मुलाने उलट उत्तर दिले तर त्यांचा अहंकार दुखवतो. मी माझ्या आईवडिलांना कधी उलट उत्तर दिले नाही आणि हा मला कसा काय देतो? असे त्यांना वाटते. आणि त्यामुळे त्यांचा आवाज चढतो, ज्यामुळे वाद वाढतो.

**मुलांना समजून घ्या**–तुमच्या मुलांच्या आक्रमक स्वभावाला तुम्हालाच आवर घालायचा आहे. त्यामुळे स्वतः आपला संयम ढासळून देऊ नका. त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करा. त्यांच्याकडून अपेक्षा करण्यापेक्षा तुम्ही काय वेगळे करता ते पहा.

### गुड टच, बॅड टचची माहिती मुलींना द्यावी

**नात्यातील लोकच अत्याचार, छेडछाड करत असल्याची अनेक उदाहरणे आहेत. हे असे असले, तरी सर्वच सारखे असतात, असे नाही. अशा काळिमा फासणाऱ्या घटना टाळण्यासाठी घरातील ज्येष्ठांनी महिला, मुलींशी संवाद साधणे आवश्यक आहे. तसेच, त्यांच्यावर लक्ष ठेवणेही तितकेच गरजेचे आहे. येथे संस्काराचा भागही महत्त्वाचा ठरतो. आपले थोडेसे दुर्लक्ष मुलगी अथवा महिलेचे आयुष्य खराब करते. त्यामुळे प्रत्येकाने काळजी घ्यावी. गुड टच, बॅड टचची माहिती मुलींना द्यावी.**

**– डॉ. पल्लवी मेहरे, वाघोली, पुणे.**

### पालकांनी विशेष लक्ष द्यावे

**महिला, मुलींना त्रास होत असल्यास तातडीने पोलिसांची मदत घ्यावी. कोणत्याही आमिषाला बळी पडू नये. लहान मुलींसोबत नेहमी संवाद ठेवावा. ठराविक वयात आल्यानंतर मुलींकडे लक्ष देण्याची गरज आहे. काही लोक त्यांच्या अल्पवयीन असल्याचा गैरफायदा घेऊन अत्याचार अथवा छेडछाड करतात. बालविवाह लावणे हा देखील गुन्हा आहे. पालकांनी विशेष लक्ष द्यावे. काही तक्रार असल्यास भेटावे.**

**– राहुल करपे, उद्योजक, सणसवाडी.**

### ११२ वर लगेच कॉल करा

**महिला, मुलीची तक्रार आली की प्राधान्याने घेतली जाते. तपासात जे निष्पन्न होईल, त्याप्रमाणे दोषारोपपत्र दाखल केले जाते. जवळपास घटनांमध्ये ओळखीचेच आरोपी असतात. मानसिकता बदलल्याशिवाय अशा घटना थांबणार नाहीत. तसेच पहिल्यांदा एखाद्याने थोडा त्रास दिला तर त्यावर लगेच आवाज उठविणे आवश्यक आहे. महिला, मुलींसह सामान्य नागरिक डायल ११२ वरून कधीही मदत घेऊ शकता.**

**– सीमा ढाकणे, पोलीस उपनिरीक्षक, चंदननगर, पुणे.**

### नायब तहसीलदार प्रांजल पवार यांच्या हस्ते

# सचिन खंडारे यांना सुधारक सन्मान पुरस्कार २०२४-२०२५ प्रदान !

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलढाणा | प्रतिनिधी**

सिंदखेडराजा तालुक्यातील साखरखेर्डा येथे दि . रोजी २८ मार्च रोजी पलसिद्ध मठातील सभागृहामध्ये महाराष्ट्र शासन अंगीकृत महिला आर्थिक विकास महामंडळ ( माविम ) बुलढाणा ' व लोकसंचालित साधन केंद्र साखरखेर्डा, नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्योग विकास प्रकल्प अंतर्गत सुधारक सन्मान पुरस्कार २०२४ – २०२५ चे आयोजन करण्यात आले होते ,

यामध्ये पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पत्रकार सचिन खंडारे यांना सुधारक सन्मान पुरस्कार २०२४ – २५ प्रधान करण्यात आला ' सुदर पुरस्कार जणूंना तांडा येथे गेल्या चार वर्षापासून रक्षाबंधनाच्या दिवशी ते महिलांना साड्याचे वाटप करत असतात ' दिवाळीला किराणा सामान कीट वाटप ' रक्तदान शिबिराचा आयोजन ' आदी कार्य ते करत असतात . व याचीच दखल घेत त्यांना सुधारक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले . सदर कार्यक्रमाचे अध्यक्षा म्हणून सरला



पुरुषोत्तम तांगडे ह्या होत्या तर प्रमुख उपस्थिती म्हणून सिंदखेडराजा तहसीलच्या नायब तहसीलदार प्रांजल पवार 'पोलीस पाटील वैशालीताई हाडे ' सरला पुरुषोत्तम तांगडे 'वैद्यकीय अधिकारी डॉक्टर परिहार ' वैद्यकीय अधिकारी ठोसरे मॅडम 'चिखली अर्बनचे व्यवस्थापक श्याम पानगोळे ,साखरखेर्डा गावच्या माजी सरपंच समनताई जगताप ,कृषी योद्धा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर खरात पाटील ' विश्वनाथ गुंडप्पा ' माजी जि . प . उपाध्यक्ष रामभाऊ जाधव ' माजी पंचायत समिती उपसभापती सुनील भाऊ जगताप , माजी सरपंच कमलाकर गवई ' साखरखेर्डा ग्राम सोसायटीचे अध्यक्ष ललित अग्रवाल 'तंटामुक्तीचे अध्यक्ष संतोष मंडळकर ' ग्रामपंचायत सदस्य देवानंद खंडागळे 'माजी सैनिक अर्जुन गवई ' ज्येष्ठ पत्रकार अशोक इंगळे ' डी . एन ' पंचाळ , वरुडी सरपंच सुधाकर गारोळे ' हे उपस्थित होते यावेळी सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले ' तहसीलदार प्रांजल पवार इतर मान्यवरांचे हस्ते सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पत्रकार सचिन खंडारे यांना सुधारक पुरस्कार २०२४ – २५ देऊन सन्मानित करण्यात आले ' इतर जणांना सुद्धा पुरस्काराचे वितरित करण्यात आले यामध्ये ' सुमेध गवई , अशांत जाधव ' मदन सरकटे 'संजय देशमुख ,दिगंबर सौभागे 'राजेश भालेकर ' अंकुश काळे ' दत्तात्रय शिंदे ' विशाल पडघान ' विष्णू डवके 'सुधाकर वानखेडे ' प्रशांत साळवे ' सुनील तांगडे 'सुनील गवई ' सोहन गवई ' अनिल मोरे ' राहुल खिल्लारे 'पत्रकार समाधान सरकटे यांना सुधारक सन्मान पुरस्कार देऊन गौरवण्यात आले ' सचिन खंडारे यांना सुधारक सन्मान पुरस्कार मिळाल्याबद्दल जिल्हाभरातून त्यांच्यावर अभिनंदन याचा वर्षाव होत आहे.

# लोकप्रिय आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या मागणीला यश

## परीवहन मंत्र्यांनी दिल्या नांदेड साठी पाच नवीन एस.टी.बसेस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव पा.कळकेकर**

नांदेड डेपोसाठी महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री मा.ना.श्री.प्रतापराव सरनाईक साहेब यांना लोकप्रिय आमदार आनंदराव पाटील बोंढारकर साहेब यांनी काही दिवसापूर्वी नांदेड डेपोसाठी महामंडळाच्या एसटी नवीन बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.या मागणीला यश आले असून मा.ना.श्री.प्रतापराव सरनाईक साहेब परीवहन मंत्री महोदयांनी नांदेड डेपोसाठी पाच नवीन बसेस पाठवलेल्या आहेत. त्या एसटी बसेसचे उद्घाटन नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर साहेब व नांदेड उत्तरचे आमदार बालाजीराव कल्याणकर साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख मा.श्री.विनय पाटील गिरडे,राज्य परिवहन विभागीय नियंत्रक श्री.वडजकर,आगार प्रमुख अनिकेत बल्लाळ,तालुकाप्रमुख श्री.उद्धव पाटील शिंदे, तालुकाप्रमुख श्री.मारोती पंढरे, श्री.बालाजी पाटील भायेगावकर, श्री.शिवराज बोंढारे, श्री .तुकाराम पवार, श्री.संभाजी जाधव, श्री .नामदेव पुयड यांच्यासह अनेक एसटी महामंडळाचे अधिकारी–कर्मचारी,शिवसेना एसटी कामगार सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# महिला गटात धाराशिव, किशोरी गटात सांगलीला विजेतेपद

## कै.भाई नेरुरकर चषक राज्य खो–खो स्पर्धा: कोल्हापूरला दुहेरी मुकुट









लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई | प्रतिनिधी**

कोल्हापूरने पुरुष व किशोर गटात विजेतेपद पटकावित कै. भाई नेरूरकर चषक राज्य खो–खो स्पर्धेत दुहेरी मुकुटमणी संपादिला. सांगलीने किशोरी गटातून तर धाराशिवने महिला गटातून विजेतेपदाचा मान मिळविला. राज्य शासनाच्या क्रीडा व युवक सेवा खात्याच्या वतीने इचलकरंजी (जि. कोल्हापूर) येथील विठ्ठल रामजी शिंदे शाळा क्रमांक २१ च्या मैदानावर या स्पर्धा संपन्न झाल्या . कोल्हापूरकडून अर्णव पाटणकर, सौरभ आडावकर, मनोज पाटील, विराज गळतगे, रोहन कोरे व श्रीराम कांबळे यांनी तर मुंबई उपनगरकडून प्रतीक देवरे व ओंकार सोनवणे यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.पारितोषिक वितरण उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी क्रीडामंत्री दत्ता भरणे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, आमदार राहुल आवाडे, आमदार अशोकराव माने, आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे, इचलकरंजी महानगरपालिकेच्या आयुक्त पल्लवी पाटील, क्रीडा उपसंचालक माणिक पाटील आदी उपस्थित होते.

**या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू**

किशोर : अष्टपैलू – सार्थक संजय हिरेकुर्ब (सांगली), संरक्षक – रुद्र उत्तम यादव (कोल्हापूर), आक्रमक – ओजस उमेश बंडगर (कोल्हापूर).

किशोरी : अष्टपैलू – अनुष्का आबासो तामखडे (सांगली), संरक्षक– श्रावणी रामहरी तामखडे (सांगली), आक्रमक –अपर्णा विशाल वर्धे (पुणे).

पुरुषः अष्टपैलू – रोहन बापूसो कोरे (कोल्हापूर), संरक्षक – ओमकार श्रीकांत सोनवणे (मुंबई उपनगर),आक्रमण – सौरभ शिवाजी आडावकर (कोल्हापूर).

महिला : अष्टपैलू – अश्विनी आप्पासाहेब शिंदे (धाराशिव), संरक्षक – संध्या सौदागर सुरवसे (धाराशिव), आक्रमक – प्रियांका हनुमंत इंगळे (पुणे) मानकरी ठरले .

# खूशखबर;शेतकऱ्यांना २५५५ कोटी विमा भरपाईचा मार्ग अखेर मोकळा

## मागच्या हंगामांमधील प्रलंबित भरपाईही मिळणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

शेतकरी खरिप हंगाम २०२४ मधील भरपाईची वाट पाहत होते. राज्य सरकारने आपल्या हिस्स्याचा पहिला विमा हप्ता दिल्यानंतर शेतकऱ्यांना २ हजार ३०८ कोटी रुपयांची भरपाई मिळणार होती. सरकारने आता विमा कंपन्यांना पहिला हप्ता तर दिलाच शिवाय खरिप २०२२ पासून रखडेलेल्या भरपाईसाठी आवश्यक अनुदान निधीही दिला. त्यामुळे शेतकऱ्यांना आता खरिप आणि रब्बी २०२२-२३, खरिप २०२३ तसेच रब्बी २०२३-२४ आणि खरिप २०२४ मधील भरपाई मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. या सर्व हंगामातील एकूण २ हजार ५५५ कोटी रुपयांची भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. शेतकऱ्यांना खरिप २०२४ मधील भरपाईची कोणत्याच प्रकारची भरपाई मिळालेली नव्हती. शिवाय खरिप हंगाम २०२२ आणि रब्बी हंगाम २०२२-२३ मध्ये ११० टक्क्यांपेक्षा अधिकची भरपाई देण्यासाठी राज्याकडे रक्कम शिल्लक होती. तसेच खरिप खरिप हंगाम २०२३ आणि रब्बी हंगाम २०२३-२४ मधील ११० टक्क्यांपेक्षा अधिक भरपाईची रक्कम आणि खरिप २०२४ मधील शेतकरी हिस्स्याचा विमा हप्ता आणि राज्य सरकारचा विमा हप्ता राज्य सरकारने दिलेला नव्हता. तसेच रब्बी हंगाम २०२४-२५ मधील शेतकरी हिस्स्याचा विमा हप्ता आणि राज्याचा विमा हप्ताही कंपन्यांना दिला नव्हता. त्यामुळे या सर्व हंगामात देय असलेली विमा भरपाईची रक्कम रखडली होती. ही रक्कम मिळावी यासाठी शेतकऱ्यांनी अनेकदा आंदोलनेही केली. लराज्य सरकारने अखेर २०२२ पासून रखडलेल्या विमा भरपाईचा मुद्दा निकाली काढला. खरिप २०२२ आणि रब्बी २०२२-२३, खरिप २०२३ आणि रब्बी हंगाम २०२३-२४, खरिप २०२४ तसेच रब्बी २०२४-२५ या सर्व हंगामातील प्रलंबित भरपाईसाठी राज्य शासनाला विमा कंपन्यांना एकूण २ हजार ८५२ कोटी रुपये राज्य हिस्सा अनुदान देणे आवश्यक होते. राज्य सरकारने आता विविध शासन निर्णयांच्या माध्यमातून ही रक्कम मंजूर केली आहे. त्यामुळे विमा कंपन्यांना ही रक्कम मिळून लवकरच शेतकऱ्यांनाही विमा भरपाई मिळणार आहे.

**किती भरपाई मिळणार?**-शेतकऱ्यांना खरिप २०२२ आणि रब्बी २०२२-२३, खरिप २०२३ आणि रब्बी हंगाम २०२३-२४, खरिप २०२४ या हंगामातील भरपाईपोटी एकूण २ हजार ५५५ कोटी रुपये मिळणार आहेत. ही भरपाईची रक्कम ६४ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.

**कोणत्या हंगामासाठी किती भरपाई मिळणार ?**-राज्य सरकारने विमा कंपन्यांना पाठीमागील हंगामातील प्रलंबित विमा हप्ता अनुदानही दिले.



त्यामुळे मागील विविध हंगामातील भरपाई शेतकऱ्यांना
मिळणार आहे.

**खरिप आणि रब्बी २०२२-२३**-खरिप हंगाम २०२२ आणि रब्बी हंगाम २०२२-२३ मध्ये काही जिल्ह्यांमध्ये विमा कंपन्यांनी ११० टक्क्यांपेक्षा जास्त विमा भरपाई निश्चित केली होती. पण ८०:११० च्या सुत्रानुसार ११० टक्क्यांपेक्षा जास्त भरपाई शासनाने द्यायची आहे. त्यामुळे या दोन्ही हंगामातील २ कोटी ८७ लाख रुपयांची भरपाई शासनाच्या अनुदानामुळे रखडली होती. आता शासनाने ही रक्कम विमा कंपन्यांना मंजूर केली आहे. त्यामुळे खरिप २०२२ आणि रब्बी २०२२-२३ मधील २ कोटी ८७ लाख रुपये शेतकऱ्यांना मिळणार आहेत.

**खरिप २०२३**-खरिप हंगाम २०२३ मध्ये काही जिल्ह्यांमध्ये ११० टक्क्यांपेक्षा अधिक भरपाई कंपन्यांनी निश्चित केली होती. मात्र राज्य सरकारने ११० टक्क्यांपेक्षा अधिक निश्चित १८१ कोटींची भरपाईची रक्कम कंपन्यांना दिली नाही. त्यामुळे ही भरपाई रखडली होती. मात्र आता सरकारने हा निधी मंजूर केला. त्यामुळे शेतकऱ्यांना खरिप २०२३ मधील १८१ कोटींची भरपाई देखील लगेच मिळणार आहे.

**रब्बी २०२३-२४**-रब्बी हंगाम २०२३-२४ मध्ये ११० टक्क्यांपेक्षा अधिकची ६३ कोटी रुपयांची भरपाई कंपन्यांनी निश्चित केली होती. पण राज्याने ही भरपाई न दिल्याने रखडली होती. पण आता राज्याने हा निधी मंजूर केल्यामुळे शेतकऱ्यांना ६३ कोटी रुपयांची भरपाई मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

**खरिप हंगाम २०२४**-खरिप हंगाम २०२४ मधील भरपाईची रक्कम शेतकऱ्यांना मिळाली नव्हती. त्यामुळे शेतकरी भरपाईची वाट पाहत होते. शेतकऱ्यांना स्थानिक नैसर्गिक आपत्ती, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती, काढणी पश्चात नुकसान आणि पीक कापणी प्रयोगावर आधारित या ट्रिगर अंतर्गत एकूण २ हजार ३०८ कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. पण राज्याने आपला विमा हप्ता दिला नसल्याने भरपाई रखडली होती. मात्र आता राज्याने विमा हप्ता कंपन्यांना दिला. त्यामुळे खरिप हंगाम २०२४ साठी शेतकऱ्यांना २ हजार ३०८ कोटी रुपये भरपाई मिळणार आहे.

# लोकशाही पत्रकार संघाच्या भोकर तालुका अध्यक्षपदी चंद्रकांत मुस्तापुरे यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गोविंद पा.मोरे**



लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष श्री भागवत वैद्य साहेब , लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री संदिप जाधव साहेब, लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष श्री प्रभाकर पांडे साहेब,लोकशाही पत्रकार संघाचे मराठवाडा सचिव पत्रकार बाजीराव पाटील कळकेकर (दैनिक लोकनेता विभागीय संपादक), लोकशाही पत्रकार संघ लातूर जिल्हा उपाध्यक्ष इस्माईल महेबुब शेख (दैनिक लोकनेता विभागीय उपसंपादक) यांनी पत्रकार चंद्रकांत विठ्ठल मुस्तापुरे यांची भोकर तालुका अध्यक्षपदी निवड केली असून या निवडीबद्दल हार्दिक अभिनंदन करून पुढील भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.पत्रकार चंद्रकांत मुस्तापुरे यांचे सर्वत्र कौतुक होत असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# डॉ.अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेचे अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणासाठी निवेदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**

सर्वाच्च न्यायालयाच्या आदेश महाराष्ट्र शासनाने स्वीकारुन अनुसूचित जातीतील उपवर्गिकरण तात्काळ करण्यात यावे .नायगांव तहसीलदार मार्फत शासनाकडे डॉ .अण्णा भाऊ साठे क्रांती सेनेच्या वतीने निवेदनाद्वारे मागणी केली आहे.अनुसूचित ५९ जातीतील घटकांना समान न्याय देण्यासाठी उपवर्गिकरणाचा अधिकार राज्य सरकारला असुन त्यांनी करावे असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहे. त्यानुसार माजी न्यायमूर्ती मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती




गठीत केली आहे.
अद्याप या समितीने अनुसूचित जातीतील ५९ जातीच्या सर्वेक्षणाचे काम सुरू केले नसल्याने हे काम तात्काळ सुरू करून अनुसूचित जातीतील ५९ जातीचे उपवर्गिकरण न्याय देण्यात यावा अशी मागणी डॉ.अण्ण भाऊ साठे क्रांती सेने च्या वतीने नायगांव तहसीलदार मार्फत शासनाकडे २८ मार्च रोजी करण्यात आली आहे. बदर समितीने आताची लोकसंख्या घ्यावी, लहुजी साळवे अभ्यास आयोगाच्या शिफारशी बदर समितीने विचारात घ्याव्या. बदर समितीने तात्काळ सर्वेक्षणाचे काम सुरु करून शासनाकडे अहवाल सादर करावा २० एप्रिल २०२५ पर्यंत मागण्यांची अंमलबजावणी नाही झाल्यास २० मे २०२५ रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर तीव्र आंदोलन करण्यात येईल असे निवेदनात म्हटले आहे.या वेळी जिल्हाध्यक्ष पंडित वाघमारे, डॉ.शंकरराव गड्डमवार,रा.ना.मेटकर, शंकरराव माळगे, डॉ.प्रभाकर गायकवाड, डॉ भिष्म झुंजारे , प्रा.भास्कर वाघमारे, राजेंद्र रेड्डी, दिगांबर रोडे, रावसाहेब बैलके. अशोक गारोळे.राधाकृष्णन झुंजारे सचिन सुर्यकार आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्र विधिमंडळ उपविधान समितीच्या प्रमुखपदी आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । संतोष पा.जाधव**



महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळ उपविधान समितीच्या प्रमुखपदी कंधार-लोहाचे विधानसभा सदस्य आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची नियुक्ती विधानसभेच्या अध्यक्षांनी केली.

तीन वेळा आमदार राहीलेल्या आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांची ही पहिल्यांदाच समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे.तसेच समितीच्या प्रमुखपदा शिवाय आमदार वेतन व भत्ते समितीच्या सदस्यपदी त्यांची नियुक्ती झाली असून, या समितीच्या प्रमुखपदी उपमुख्यमंत्री अजित पवार साहेब आहेत. दरम्यान, उपविधान समितीच्या आ.प्रतापराव पाटील चिखलीकर , आ.रवी पाटील, आ.सुधीर गाडगीळ, आ.संजय पुराम, आ.किशोर जोरगेवार, आ.जितेश अंतापूरकर, आ.राघवेंद्र पाटील, आ.अनुराधा चव्हाण, आ.राजेंद्र गावित, आ.दिलीप लांडे, आ.राजेंद्र पाटील यड्रावकर, आ.चंद्रकांत नवघरे, आ.सिद्धार्थ खरात, आ.अस्लम शेख या १४ आमदार सदस्यांचा समावेश आहे.

# सावता परिषदेच्या माध्यमातून गोरखनाथ राऊत यांचे सामाजिक कार्य उल्लेखनीय-सुनील शिंदे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रासह मराठवाड्यात सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे यांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारे गोरखनाथ राऊत यांची नुकतीच सावता परिषदेच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी निवड करून त्यांचा माळी समाज बांधवांनच्या वतीने शहरातील महात्मा फुले व सावित्रीबाई फुले स्मारक येथे फटाक्यांची आतषबाजी करत सत्कार व सन्मान करण्यात आला. संपूर्ण महाराष्ट्रात ओबीसी समाजासह माळी समाजाची धुरा सांभाळणारे



सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे यांनी नुकतीच महाराष्ट्र राज्य कार्यकारणीवर निवड जाहीर केली त्यात सावता परिषदेचे संपूर्ण मराठवाड्यासह महाराष्ट्रात अविरतपणे कार्य करणारे अडल्या-नडल्यांची मदत करणारे व समाज संघटन वाढीमध्ये नेहमी अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या व कल्याण आखाडे यांच्या खांद्याला खांदा लावुन गेली अनेक वर्षांपासून संघटना वाढीसाठी सावता परिषदेचे कार्य करत असलेले स्वाभीमानी, ध्येय वेढे, असे गोरखनाथ राऊत यांची नुकतीच संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे यांनी सावता परिषदेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी त्यांची निवड करून त्यांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान केला त्यामुळे नांदेड जिल्ह्यासह महाराष्ट्र व मराठवाड्यात त्यांच्या निवडीबद्दल कौतुक होत आहे. सावता परिषदेचे नांदेड जिल्हा उपाध्यक्ष सुनील बालाजी शिंदे यांच्या सह समस्त जिल्यातील माळी समाज बांधवांनकडून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

# व्हि.पी.के.उद्योगातील साखर कारखान्याच्या गाळपाची सांगता

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पा.कळकेकर**

व्ही पी के उद्योग समूहातील साखर कारखाना गाळपाची सांगता मा.लोक कल्याणकारी नेतृत्व श्री मारोतराव व्यंकटराव पाटील कवळे गुरुजी चेअरमन साहेब यांच्या हस्ते झाली त्यांनी उद्योग समूहातील सर्व अधिकारी, कर्मचारी, ऊस तोडणी ,वाहतूक ठेकेदार प्रत्यक्ष अप्रत्यक्ष ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्यांचे मनापासून अभिनंदन केले असून ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे मनस्वी आभार मानले आहेत. मुख्य शेतकरी एम.व्ही.के.वाघलवाडा सर्व



उद्योगातील अधिकारी ,कर्मचारी, ऊस उत्पादक शेतकरी यांना गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा तसेच मुस्लिम बांधवांना ईदनिमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# सिडकोतील विमल सेतू सुविधा केंद्र येथे उपविभागीय अधिकारी डॉ.खल्लाळ यांची भेट,ग्राहकांशी संवाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नवीन नांदेड । सुनील शिंदे**

विमल सेतू सुविधा केंद्र सिडको येथे उपविभागीय अधिकारी डॉ.खल्लाळ यांनी पाहणी करून केंद्र संचालक विजय जोंधळे यांची प्रशंसा केली व सेतु सुविधा केंद्र येथे उपस्थित ग्राहकांशी संवाद साधला.

नांदेड उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ यांनी सिडको संभाजी चोक भागातील विमल सेतू सुविधा केंद्र येथे २८ मार्च रोजी भेट देऊन सुविधा केंद्र येथील नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या अनेक योजना माहिती असलेले पोस्टर व ईतर योजना बाबत व सुविधा




केंद्र यांना मिळालेल्या उत्कृष्ट कार्य बदलचे पुरस्काराची माहिती दिली, यावेळी उपस्थित ग्राहकांशी संवाद साधला, यावेळी नायब तहसीलदार संजय नागमवाड,मंडळ अधिकारी अनिल धुळगंडे, सुजलेगावकर, क्रांतीकुमार पंडित,यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ.सचिन खल्लाळ यांनी पाहणी करून संचालक जोंधळे यांची प्रशंसा केली व ग्राहकांशी संवाद साधला यावेळी जोंधळे यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. केंद्रातील गजानन मोरे,अनामिका झुंजारे, संदेश जोंधळे यांच्या सह जेष्ठ नागरिक, पत्रकार उपस्थित होते.

# पुणे जिल्ह्यातील स्टोनक्रशर व खाणपट्टाधारकांनी सर्व परवानग्या घेवूनच उत्खनन करावे-जिल्हाधिकारी डुडी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे । बबनराव धायतोंडे**

पुणे जिल्ह्यातील तात्पुरते व कायमस्वरुपी क्रशर व खाणपट्टाधारकांनी सर्वप्रकारच्या परवानग्या घेवूनच उत्खनन करावे, परवानगी करीता लागणाऱ्या सर्व संबंधित विभागाकडून ना–हरकत प्रमाणपत्र घेवून परवानगीकरीता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करावा,असे आवाहन पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.जिल्हाधिकारी कार्यालयात क्रशर व खाणपट्टाधारकांच्या अडचणी बाबत आयोजित केलेल्या बैठकीत ते बोलत होते.

यावेळी अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी,निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम,जिल्हा खनिकर्म अधिकारी सुयोग जगताप,जिल्हा क्रशर खाणपट्टाधारक संघटनेचे अध्यक्ष प्रदिप कंद यांच्यासह जिल्ह्यातील क्रशर खाणपट्टाधारक उपस्थित होते.

क्रशर आणि खाणपट्टाधारकांच्या समस्या जाणून घेवून डुडी म्हणाले क्रशर आणि खाणपट्टा परवानगीकरीता लागणाऱ्या पर्यावरण ना–हरकत प्रमाणपत्राकरीता क्रशर आणि खाणपट्टाधारकांना परवानगी देण्याबाबत पर्यावरण विभागाच्या सचिवांना विनंती करण्यात येईल. क्रशर खाणपट्टाधारकांनी आपल्या वाहनांवर जीपीएस लावून इलेक्ट्रानिक ट्रन्झिंट पासेस (ईटीपी) ठेवावे.आपआपल्या खाणपट्ट्याची भूमी अभिलेख विभागाद्वारे मोजणी करुन घ्यावी.खाणपट्टयात केलेले उत्खनन आणि त्याकरीता भरलेल्या शुल्काचा ताळमेळ संबंधित तहसीलदाराकंडून तपासणी करून घ्यावा हे सर्व क्रश व खाणपट्टा धारकांवर बंधनकारक असेल.पुणे जिल्ह्यातील संपूर्ण तालुक्यामध्ये पारदर्शक पद्धतीने कामकाज करण्यावर प्रशासनाचा भर आहे. त्यामुळे प्रशासनाच्यावतीने घालून दिलेल्या नियमांचे सर्वांनी काटेकोरपणे पालन करावे.आपल्या परिसरात बेकायदेशीर कामकाज होत असल्यास प्रशासनास तात्काळ कळवावे,याबाबत तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवून संबंधित क्रेशरवर कारवाई करण्यात येईल,असेही डुडी म्हणाले.



यावेळी बोलताना मापारी म्हणाले कि तात्पुरते खाणपट्टाधारकांनी नियमाप्रमाणे ६ मीटर पेक्षाअधिक खोल खोदकाम करु नये.आवश्यक असलेल्या सर्वप्रकारच्या परवानग्या उपलब्ध करुन देण्याकरीता प्रशासनाच्यावतीने सहकार्य करण्यात येईल,असेही मापारी म्हणाले.यावेळी कंद यांनी क्रशर, खाणपट्टाधारकांच्या अडीअडचणींबाबत सूचना केल्या. प्रशासनाच्यावतीने घालून देण्यात आलेल्या नियमांचे पालन करुन प्रशासनास सहकार्य करण्यात येईल, असे कंद म्हणाले.दौंड तालुक्यात अनेक खडीक्रशर असुन यापैकी किती खडीक्रशरचे परवाने आहेत.असतील तर त्याचे नुतनीकरण केले आहे का? तसेच खाण खोदकाम करताना त्यांची रुंदी खोली याचे मोजमाप आहे का ? महसूल व गौण खनिज विभागाच्या ६ मिटर चा नियम खरच पाळला जातोय का? आणि पाळला जात नसेल तर तहसीलदार व महसूल आणि गौण खनिज विभाग अशा क्रशरवरती कडक कारवाई करणार का? हा देखील प्रश्नच आहे.या खडी क्रशरमुळे पर्यावरणाची तसेच मानवी आरोग्याची हानी तर होत नाही ना अशी दौंड तालुक्यातील जनतेत जोरात चर्चा चालू आहे.

## दौंड तालुक्यातील खडीक्रशर मालकांचे कडून पर्यावरणाचे नियम धाब्यावर !

**दौंड तालुक्यातील वासुंदे परीसरात मोठ्या प्रमाणात खडीक्रशर व्यवसाय सुरू असुन वाळु व रेतीला पर्याय म्हणून सध्या क्रशसॅण्डचा वापर केला जात आहे.त्यामुळे या क्रशसॅण्ड ला सध्या सोन्याचा भाव आला आहे.मात्र खडी क्रशर चालवत असताना पर्यावरण विभागाची परवानगी आवश्यक असते ही परवानगी किती क्रशर मालकांचे कडे आहे व असेल तर त्या मधील नियम व अटींची पूर्तता केली जाते का? हे देखील पर्यावरण विभागाकडून पाहणे आवश्यक असुन बहुतांश क्रशर वरती पर्यावरण विभागाच्या अटी व नियम फक्त कागदावरच असल्याचे दिसून येते.**

## लोकनेते मारोतराव कवळे गुरुजींनी उभारलेल्या

# ३ युनिटच्या ऊस गाळपातुन शेतकऱ्यांच्या खिशात १५० कोटी रुपये केवळ ऊस बिलाची रक्कम

## हंगाम २०२४–२५ च्या कालावधीत ६ लाख १६ हजार ७५० मेट्रिक टन ऊस गाळप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कापसी । बालाजी पा.शिंदे**

लोकनेते मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्यात ३ कारखाने ,दूध डेअरी, २० पतसंस्थेच्या शाखा उभारून फुलवलेल्या या माळरानावरच्या नंदनवणात लाखो शेतकरी सुखी संपन्न झाले, येथूनच हजारो कुटुंबियांचा संसार थाटण्याचं काम या देवरुपी माणसान केलय हे कोणी नाकारू शकत नाही. शेतकऱ्यांसाठी साम्राज्य उभे करण्यासाठी हिंमत लागते तेच व्यक्ती जिगरबाज असतो.

कवळे गुरुजी म्हटले की निष्कलंक चारित्र्य संपन्न चांगलें विचार दुसऱ्यांना सामर्थ्य निर्माण करून यशाचा पाऊल खुणा दाखवणारा असा कवळे गुरुजी होय.सिंधी गावच्या च्या खडकाळ जमिनीवर सहा महिन्यात कारखाना उभारून परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्यायदेण्याचे काम कवळे गुरुजी ने केले हे परिसरातील शेतकऱ्यांना नाकारता येत नाही उघडचा डोळयाने जिल्हा पाहतोय.एवढेच नाही.१३ महिन्याचे ऊसपीक असल्याने शेतकऱ्यांना शेती जोडव्यवसाय दुग्धव्यवसाय यास इतर कोणत्याही व्यवसायाला प्राधान्य देत आपल्याच पतसंस्थेतून अल्प दरात कर्ज वाटप करून अनेकांना व्यवसायाची संकल्पना दिली.याही पुढे चार कारखान्याचा ऊस दहा हजार गाळप झाला पाहिजे असे नियोजन बध काम युध्दपातळीवर चालू आहे. या जिल्ह्यात अशा देरूपी माणसाचा जन्म झालाय.हे आपलं परम भाग्यच म्हणावं लागेल. अनेक व्यक्ती या माणसाला राजकारणातून विरोध करतात पण खरं पाहिलं तर राजकारण करावं पण तत्वाचं आणि विकासाच कराव तरच आपला विकास आणि आपल्या कुटुंबियांचा विकास निश्चित झाल्याशिवाय राहत नाही हे कवळे गुरुजीचे विचार नेहमी आत्मसात केले पाहिजे.



# अंध विद्यालयाचे राज्य स्तरीय क्रीडा स्पर्धेत यश




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । धनाजी जोशी**

दिव्यांगांच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत देगलूर येथील अंध विद्यालयातील दोन विद्यार्थिनींनी घवघवीत यश प्राप्त करत देगलूर चे नावलौकिक केले आहे.नागपूर येथे रेशीम बाग मैदान येथे दिव्यांग राज्य स्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या. २१ मार्च ते २३ मार्च या तीन दिवसीय क्रीडा स्पर्धेत राज्यातील दिव्यांग विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये देगलूर येथील अंध विद्यालयातील एकूण सहा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यात बुद्धिबळ स्पर्धा मध्ये प्रतीक्षा किशन कांबळे (वर्ग ८) हिने संपूर्ण राज्यातून द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे तर कु. मनोजा मारोती आवरूल वर्ग ८ धावणे प्रकारात राज्यातून तृतीय क्रमांक पटकावला आहे. दरवर्षी सदरील राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन केले जाते. यात वर्षी येथील अंध विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यशप्राप्त केले आहे. या विद्यार्थ्यांना शाळेतील क्रीडा शिक्षक व्हि. एन. किर्तीवार, गायकवाड एम.बी. यांनी मार्गदर्शन केले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन शाळेचे मुख्याध्यापक एम.व्ही. शिंदे, शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आदी उपस्थित होते.


# राष्ट्रवादीच्या वतीने तळेगाव येथे इफ्तार पार्टी!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । किशनराव गायकवाड**

ईद सणानिमित्त मुस्लिम बांधवांचे रोजे चालू आहेत.त्यानिमित दर वर्षी प्रमाणे तळेगाव येथील जामामशीद येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस डॉ विक्रम देशमुख यांच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी मशीदचे मौलाना मुफ्ती सोहेल साहाब, हाजी मोगल चांदपाशा पटेल, माजी उपसरपंच मैनुला बेग, हाजी शेख ताजोदीन, माजी सरपंच रामराव रेड्डी, मोगल खायाज बेग पटेल, माजी सरपंच गंगाधर शिगळे, मोगल मुसा बेग,शेख बाहोदीन,एस.के. मोगल, सज्ञाद पटेल,शेख आलोमोध्दीन साहेब, मोगल मुस्ताक




बेग, मोगल अनु मिस्त्री,शेख नवाज, योग्य मुझम्मील पटेल, मोगल अकबर बेग, माजी उपसरपंच समीर शेख, सिकंदर पटेल, जब्बार पटेल,ईशाक पटेल,मियां भाई, आदी उपस्थित होते.




नांदेड येथील पंचायत समितीला गटविकास अधिकारी कायमस्वरूपी द्या पैसे घ्या पण अधिकारी द्या म्हणून इंजेगावच्या महिला सरपंच मुक्ताई पंचलिंगे व गावातील नागरिक नांदेड येथे उपोषणाला बसले आहेत.( छाया – स्वाती सोनकांबळे)

# सुभाष पांडुरंग चव्हाण यांना समाज प्रबोधन व काव्यवाचनयासाठी राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । संदीप वडजे**

मुखेड तालुक्यातील कोटगळवाडी येथील सुभाष पांडुरंग चव्हाण यांना आद्य क्रांतिगुरू लहुजी साळवे यांच्या स्मृतिदिनानिमित्त राज्यस्तरीय समाज प्रबोधन व काव्यवाचन यांच्यासाठी राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले सुभाष पांडुरंग चव्हाण हे मुखेड तालुक्यातील कोडगळवाडी येथील असून ते साहित्य दळप्रमुख मुखेड तथा मॅनेजर यशोदीप लोकसंचल लोकसंचालित साधन केंद्र देगलूर समाज प्रबोधन गायक भजन समाजावर आधारित कविता गोर सिक वाडी गोर सेना या संघटनेत अग्रेसर असून वेगवेगळ्या भूमिकेत ते कार्यरत आहेत ते आज पर्यंत अनेक कविता




काव्यवाचन त्यांनी करीत आलेले आहेत गोरसेना संघटनेमध्ये देखील ते अग्रेसर आहेत या सर्वांची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला या पुरस्कार मिळाल्याबद्दल गोर सेना राष्ट्रीय अध्यक्ष प्राध्यापक संदेश चव्हाण भायखळ शशिकला राठोड आरसी चव्हाण सौ सुमनबाई पांडुरंग माजी सरपंच कोटग्याळवाडी पांडुरंग चव्हाण माजी सरपंच शिवाजी राठोड वंडगीरकर,सिंधुताई कां बळे, चंद्रकला जामखेडकर गोरसिकवाडी गोरसेना टिम नांदेड व विशेष सहकार्य प्रा.भीमराव दिपके सिंधू महाविद्यालय देगलूर इत्यादींनी सुभाष पांडुरंग चव्हाण यांना आद्य क्रांतिगुरू लहुजी साळवे यांच्या स्मृतिदिनानिमित्त राज्यस्तरीय समाज प्रबोधन काव्य पुरस्कारासाठी आद्य क्रांतिगुरू बहुउद्देशीय सेवाभावी संस्था गुंधा तालुका लोणार जि.बुलढाणा कार्यक्रमाचे अध्यक्ष हभप नन ई महाराज व कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ भगवान बाबा आनंद गडकर श्री डॉ अंबादास सगर श्री धनंजय भिसे डॉक्टर सचिन साबळे संदीप मानकर पत्रकार दिगंबर वाघमारे पत्रकार नांदेड प्रा किलवरकर सर केशवराव फुके माजी सभापती पंचायत समिती लोणार क्रांती गुरु सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष शंकर मानवतकर सचिव सौ गोदावरी शंकर मानवतकर ज्ञानदेव मानवतकर या या सर्वांच्या उपस्थितीत सुभाष चव्हाण यांना हा पुरस्कार देण्यात आला सुभाष चव्हाण यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल मुखेड तालुक्यातून व देगलूर तालुक्यातून सामाजिक राजकीय शैक्षणिक विविध क्षेत्रातून अभिनंदन कौतुक होत आहे.

# करकाळा येथे वासंतिक कार्यक्रम संपन्न!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । किशनराव गायकवाड**

करकाळा ता उमरी येथे साहित्यिक कवी च्या उपस्थित वासंतिक कथाकथन कार्यक्रम गुरूवारी दि २७ मार्च रोजी उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे आयोजन कै.बापुराव पाटील कदम करकाळेकर यांच्या स्मरणार्थ करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी व्हिपीके समुहाचे अध्यक्ष मारोतराव कवळे गुरुजी यांनी मार्गदर्शन केले.त्यांनी आपल्या भाषणात साहित्याच्या महत्वावर प्रकाश टाकला आणि या कार्यक्रमांच्या आयोजनासाठी आयोजकांचे आभार मानले.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा.डाक्टर शंकर विभुते उपस्थित होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून देविदास फुलारी आणि प्रा.महेश मोरे यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमामध्ये विविध अशायाच्या कथाकथन करण्यात आल्या.त्यात दिंगबर कदम, अनुपमा बन, रोहीणी पांडे, रूचिरा बेटकर,राम तरटे, यांच्यासारख्या प्रमुख साहित्यिकांनी आपापल्या कथा सादर केल्या.काही कथा श्रोत्यांना हसवुन सोडत होत्या तर काही कथा हळव्या क्षणांची भावना प्रकट श्रोत्यांच्या डोळ्यात अश्रू अणणा–या होत्या.दोन तासांचा हा कार्यक्रम श्रोत्यांसाठी मनोरंजक आणि समृद्ध अनुभव ठरला. कार्यक्रमाला रघुनाथ पाटील कदम, आनंद कदम,मल्लु, कमळे, साहेबराव कदम, व्यंकट पाटील, दिलीप सावंत,व महिला उपस्थित होत्या.राम तरटे यांनी सुत्रसंचलन केले.तर दिंगबर कदम यांनी आभार मानले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904